सह महापालिका आयुक्त कार्यालय
मुख्य लेखा व वित्त विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र :- 2731
दिनांक :- 07/10/24

-: कार्यालय परिपत्रक :-

विषय :-पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/ सेवकांना सन २०२३-२४ या वर्षासाठी सानुग्रह अनुदान आदा करणेबाबत.

संदर्भ :-१) मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १२५९ दिनांक १८/१०/२०२१.
२) मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ४८६ दिनांक १८/१०/२०२१.
३) मा. महापालिका आयुक्त ठराव क्रमांक ६/५४४ दिनांक २५/१०/२०२१.
४) मा. महापालिका आयुक्त ठराव क्रमांक.६/६८६ दिनांक ०४/१०/२०२४.

पुणे महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी सेवक (रोजंदारी कामगारांसह) आणि माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना, शिक्षण मंडळाकडील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना तसेच बालवाडी शिक्षण सेविका, शिक्षक, शिक्षण सेवक सन २०२३-२४ च्या मुळ वेतन + महागाई भत्ता यावर ८.३३% + विहीत दराने सानुग्रह अनुदान आदा करणेबाबत संदर्भ क. १ ते ४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. १ ते ४ चे मान्यतेनुसार सदरचे कार्यालय परिपत्रक प्रस्तृत करण्यात येत आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. पुणे महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी सेवक (रोजंदारी कामगारांसह) आणि माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना, प्राथमिक शिक्षण विभागाकडील शिक्षक, शिक्षकेत्तर सेवकांना, बालवाडी शिक्षण सेविका, शिक्षक तसेच शिक्षण सेवकांना सन २०२३-२०२४ च्या मूळ वेतन + महागाई भत्ता यावर ८.३३% + र.रू. २३,०००/- इतके सानुग्रह अनुदान उपस्थितीचे प्रमाणात आदा करण्यात यावे.
२. ज्या वर्षा करीता सानुग्रह अनुदान द्यावयाचे त्या वर्षामध्ये संबंधीत सेवकांची (धाण भत्ता देय असणाऱ्या सेवकांसह) कामावरील प्रत्यक्ष हजेरी किमान १८० दिवस असण्याची अट लागू राहील. तथापि, फक्त कामावर असताना व काम करित असताना घडलेल्या अपघातामुळे विशेष वैद्यकीय रजा एखाद्या सेवकांस द्यावी लागल्यास अशी रजा मनपा सेवाविनियमाच्या मर्यादेत हजेरी धरण्यात येईल.
३. किमान एक वर्ष शासकिय सेवा झालेल्या सेवकांची त्यापुढील आर्थिक वर्षातील हजेरी विचारात घेऊनच सानुग्रह अनुदान देय राहील.

४. सन २०२३-२४ साठी द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबतच्या अन्य अटी व शर्ती तसेच सेवापुस्तक व वेतन बिलावर ठेवावयाचे दाखले याबाबतचा तपशील सोबतचे परिशिष्टात दिलेला आहे, त्यानुसार तजवीज करावी. तसेच सोबतच्या परिशिष्टानुसार संघटना निधीची रक्कम कपात करण्यात यावी.

५. सर्व पात्र सेवकांना सानुग्रह अनुदान द्यावयाचे असल्याने सदरची बिले ऑडीट विभागातून दि. १८/१०/२०२४ अखेर पर्यत तपासून घ्यावीत. सदरच्या रकमा बँक खात्यातून आदा होणार असल्याने त्याबाबतची आवश्यक ती संगणक प्रणाली (व्हर्जन) सांख्यिकी व संगणक कार्यालयाकडून त्वरीत प्राप्त करून घ्यावी.

६. ज्या अधिकारी/ सेवकांना सानुग्रह अनुदानातून आयकर व पुरसंचय निधी योजना लागू असलेल्या ज्या सेवकांना पुरसंचय निधीची वर्गणी कपात करावयाची आहे त्यांनी त्याबाबतची पूर्वसुचना संबंधीत बिल लेखनिकांना देणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे आयकर व पुरसंचय निधी वर्गणी कपात करण्याची सुविधा संगणक प्रणालीमध्ये करण्यात आली आहे.

७. माहे सप्टेंबर २०२४ चे वेतन सबधीत सेवकास ज्या खात्याकडून देण्यात आले आहे. त्या खात्याने सानुग्रह अनुदान आदा करावयाचे आहे.

८. आर्थिक वर्ष संपल्यानंतरही सदर वर्षाचे सानुग्रह अनुदान देणेबाबतची मागणी वारंवार होते असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषगाने असे निश्चित करणेत येत आहे की, सानुग्रह अनुदान हे केवळ त्या आर्थिक वर्षामध्ये देणे अनुज्ञेय राहील. तदनंतर याबाबतची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

तरी, सन २०२३-२४ या वर्षासाठी सानुग्रह अनुदान आदा करण्याकरीता वरीलप्रमाणे पुर्तता करणेविषयी सर्व मा. खातिप्रमुख यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सर्व संबंधीत बिल लेखनिकांना जरूर त्या सुचना देण्याची तजवीज करणे विषयी विनंती आहे.

(उल्का कळसकर)
सह महापालिका आयुक्त तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पुणे महानगरपालिका

सोबत :- परिशिष्ट

प्रत :- सर्व मा. खातेप्रमुख, सर्व मा. महापालिका सहाय्यक आयुक्त,
सर्व परिमंडळे व क्षेत्रिय कार्यालये, पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी व पुढील तजवीजीसाठी रवाना....

-: परिशिष्ट :-

सानुग्रह अनुदानाबाबत अटी / शर्ती

१. सन २०२३-२४ मध्ये रोजंदारी कामगारांनी किमान १८० दिवस काम केले असेल तर त्यांना सेवाकालावधीनुसार व हजर दिवसांच्या प्रमाणात सदर रकमा देण्यात याव्यात. रोजंदारीसाठी २६ दिवसांचा महिना असल्याने सानुग्रह अनुदानातील जादा रकमेस ३१३ दिवसांनी भागून दैनिक दर काढण्यात यावा. तसेच, खाडे रोजंदारी कामगारांना हजर दिवसांच्या प्रमाणात सदर रकमा देण्यात याव्यात. मात्र रोज काढताना ३१३ दिवसांनी भागून दैनिक दर काढण्यात यावा.

२. सन २०२३-२४ या वर्षासाठी देय सानुग्रह अनुदानाची रक्कम बँक खात्यात जमा होण्यापूर्वी ज्या सेवकांना बडतर्फ केले असेल अशा अधिकारी / सेवकांना सानुग्रह अनुदान दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे खातेनिहाय चौकशी कामी व अन्य कारणांमुळे ज्या अधिकारी/ सेवकांना कामावरून निलंबित केले असेल अशा अधिकारी/ सेवकांना खातेनिहाय चौकशीचे काम व अन्य कार्यवाही पूर्ण होऊन त्याबाबतचा अंतिम निर्णय घोषित होईपर्यंत सदर रक्कम दिली जाणार नाही.

३. ज्या अधिकारी/सेवकांनी सन २०२३-२४ या वर्षात महापालिकेची सेवा केली आहे परंतु, त्यांची सेवा सेवानिवृत्ती/वैद्यकिय दृष्ट्या अपात्र अगर मृत्यु या कारणामुळे संपुष्टात आली असेल अशा अधिकारी/ सेवकांना सेवेच्या कालावधीनुसार उपस्थितीच्या प्रमाणात वरील प्रमाणे रकमा देण्यात याव्यात.

४. आर्थिक वर्ष संपल्यानंतरही सदर वर्षाचे सानुग्रह अनुदान देणेबाबतची मागणी वारंवार होते असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने असे निश्चित करणेत येत आहे की, सानुग्रह अनुदान हे केवळ त्या आर्थिक वर्षामध्ये देणे अनुज्ञेय राहील. तदनंतर याबाबतची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

५. मा. महापालिका आयुक्त ठ.क्र.६/६८६ दि.०४/१०/२०२४ नुसार सन २०२३-२४ या वर्षासाठी देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदान रकमेतून खालील तक्त्यानुसार संघटना निधी कपात करण्यात यावा.

| सानुग्रह अनुदान + जादा रक्कम मिळून होणारी एकूण र.रू. | संघटना निधी र.रू. |
|---|---|
| वर्ग १ मधील अधिकारी | ७००/- |
| वर्ग २ मधील अधिकारी | ७००/- |
| वर्ग ३ मधील अधिकारी व सेवक | ५००/- |
| वर्ग ४ मधील सेवक/कर्मचारी | ४००/- |

वरीलप्रमाणे सानुग्रह अनुदानाची बिले दिनांक १८/१०/२०२४ अखेर पर्यंत तपासून घ्यावी.

NSolanke
7/10/2024

अंतर्गत अर्थान्विक्षक
पुणे महानगरपालिका

## सेवापुस्तकात ठेवावयाचा दाखला

१) मा. स्थायी समिती त.क्र. १२५९ दिनांक १८.१०.२०२१, मा. महानगरपालिका सभा ठ.क्र. ४८६ दिनांक १८.१०.२०२१ व मा. महापालिका आयुक्त ठ. क्र. ६/६८६ दिनांक०४/१०/२०२४ अन्वये मनपा अधिकारी/ सेवकांना सन २०२३-२४ च्या मुळ वेतन + महागाई भत्ता यावर ८.३३% + र.रु. २३,०००/- सानुग्रह अनुदान उपस्थितीच्या प्रमाणात आदा करण्यास मान्यता.

२)दिनांक ०१.०४.२०२३ ते दिनांक ३१.०३.२०२४ या मुदतीचे र.रु........................ + र.रु.२३,०००/- सानुग्रह अनुदान ऑडीट बिल क्रमांक वे/................ दिनांक ...................... ने आदा.

३)सन २०२३-२४ या वर्षातील प्रत्यक्ष आदा करण्यात आलेले मुळ वेतन + महागाई भत्ता यावर उपस्थितीचे प्रमाणात सानुग्रह अनुदान आदा करण्यात आले आहे.

खातेप्रमुख

## वेतन बिलावर ठेवावयाचा दाखला

१)मा. स्थायी समिती ठ. क्र.१२५९ दिनांक १८.१०.२०२१ मा. महानगरपालिका सभा ठ. क्र. ४८६ दिनांक १८.१०.२०२१ व मा. महापालिका आयुक्त ठ. क्र.६/६८६ दिनांक.०४/१०/२०२४ अन्वये मनपा अधिकारी / सेवकांना सन २०२३-२४ या वर्षाच्या मुळ वेतन + महागाई भत्ता यावर ८.३३% + र. रू. २३,०००/- सानुग्रह अनुदान उपस्थितीच्या प्रमाणात आदा करण्यास मान्यता.

२)सानुग्रह अनुदान रक्कमेची आकारणी सन २०२३-२४ या वर्षातील प्रत्यक्ष झालेली सेवा व घेतलेले वेतन तसेच इतर मान्य अटी शर्ती नुसार करण्यात आलेली आहे.

३)सदर बिलामध्ये समाविष्ट असलेले सेवक माहे सप्टेंबर २०२४ मध्ये आमच्या खात्यात वेतनास आहेत.

४)सदर बिलामध्ये समाविष्ट असलेल्या सेवकांच्या सेवापुस्तकात योग्य ते दाखले ठेवले आहेत.

खातेप्रमुख